**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र. शिसस/उशि/पुवि/स्वायत्त कार्यशाळा/२०२०/250 दिनांक २८.१.२०२०

प्रति,

प्राचार्य / प्राचार्या,
नॅक अ,अ+,अ++ श्रेणी प्राप्त
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे / अहमदनगर / नाशिक जिल्हे.**

विषय - **महाविद्यालयीन स्वायत्ताबाबत....**

संदर्भ - मा. कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. बैठक-२०१९/प्र.क्र.३५०/विशि-३ दि. १७ डिसेंबर २०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मा. राज्यपाल महोदय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३० सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने तसेच मा. सचिव, उच्च शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक ७ नोव्हेंबर २०१९ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे रुसासंदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीच्या अनुषंगाने मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्राचे इतिवृत्तामधील मुददा क्र. २ (E) च्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत उच्च शिक्षणांतर्गत येणारी महाविद्यालये ज्यांनी नॅक मूल्यांकनामध्ये अ,अ+, अ++ दर्जा प्राप्त केलेला आहे अशा महाविद्यालयांना स्वायत्ता (Autonomous) दर्जा घेण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी **दिनांक ३१ जानेवारी २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता संत ज्ञानेश्वर सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे** कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यशाळेसाठी डॉ. विजय जोशी, मुख्य सल्लगार, रुसा, मुंबई हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे हे महाविद्यालयांना स्वायत्तेसंबंधी (Autonomy) मार्गदर्शन करणार आहेत.

सदर कार्यशाळेसाठी आपण स्वत: उपस्थित रहावे तसेच आपल्या महाविद्यालयांचे व्यवस्थापन प्रतिनिधी (अध्यक्ष / सचिव) यांना उपस्थित राहणेबाबत विनंती करण्यात यावी.

(डॉ. मोहन खताळ)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

प्रत - १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तारभवन, मुंबई -३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. उपकुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव.